जिल्हा व सत्र न्यायालय, मध्यवर्ती अभिलेख विभाग, औरंगाबाद.

**फाडसाळ केलेल्या कागदपत्रांची रद्दी विक्री करणेबाबत निविदा सुचना**

**दिनांक 20.02.2025**

संदर्भः—जिल्हा मध्यवर्ती अभिलेख कक्ष, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांचे कार्यालयीन आदेश दि. 18.02.2025

---

मा. जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद येथील मध्यवर्ती अभिलेख कक्षातील फाडसाळ केलेल्या कागदपत्रांची रद्दी विक्री करणे आहे.

त्यास अनुसरून सरकारमान्य रद्दी खरेदीदारांकडून निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुक सरकारमान्य रद्दी खरेदीदारांनी आपली निविदा **दि. 05.03.2025 रोजी सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत किंवा तत्पुर्वी बंद लिफाफ्यात** जिल्हा मध्यवर्ती अभिलेख कक्ष, जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद यांच्याकडे दाखल करावी. त्यानंतर आलेली कोणतीही निविदा स्वीकारण्यात येणार नाही.

रद्दी विकत घ्यावयाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

01) निविदा दाखल करण्यापूर्वी **"मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद"** यांचे नावाने रूपये 500/— ( अक्षरी रूपये पाचशे मात्र ) चा धनादेश सहाय्यक अधीक्षक, लेखा व वित्त विभाग, औरंगाबाद यांच्या कार्यालयात जमा करावा. त्याशिवाय कोणतीही निविदा विचारात घेतली जाणार नाही. सदर रक्कम ही ना—परतावा असेल.

02) रूपये 500/— जमा केल्याबाबतची पावती मध्यवर्ती अभिलेख कक्ष, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांचेकडे निविदा असलेल्या बंद लिफाफ्यासोबत जोडून सादर करावी.

03) निश्चित केलेल्या दरापेक्षा ज्यांचे दर अधिक असतील अशाच खरेदीदारांची निविदा विचारात घेतली जाउन त्यांना फाडसाळ कागदपत्रांच्या रद्दीची विक्री करण्यात येईल.

04) ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांनी विहित मुदतीत रद्दी खरेदी न केल्यास त्यांच्यानंतर ज्यांचा रद्दी खरेदीचा दर अधिक असेल त्यांना रद्दी खरेदी करण्याबाबत आमंत्रित केल्या जाईल, याची नोंद घ्यावी.

पान नं. 2 वर

05) ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांनी कागदी रद्दी मोजुन घेण्याकरिता वजन काटा व सर्व रद्दी भरण्याकरिता पोत्यांची व्यवस्था स्वतः करावी.

06) ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांनी सदर रद्दी ही 10 दिवसांमध्ये नेण्याची व्यवस्था करावी. यासाठी मुदतवाढ मिळणार नाही.

07) रद्दी खरेदीदारांनी यापुर्वी इतर कोणत्या सरकारी कार्यालयाकडून किती दराने रद्दी खरेदी केलेली आहे, त्याची एक निविदा प्रत पडताळणीकरिता सोबत जोडावी.

08) कोणतीही निविदा कारण न दाखविता ना–मंजुर करण्याचे अधिकार तसेच सदर निविदांची सुचना ही कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद यांना राहतील.

नियमाप्रमाणे सदरची निविदा प्रसिध्द करण्यात यावी.

( एस. एस. गोरवाडे )
जिल्हा न्यायाधीश –09 तथा
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, औरंगाबाद
District Judge
Additional Sessions Judge
Aurangabad

जा.क्र./म.अभिलेख/ 2364 /2025
मध्यवर्ती अभिलेख विभाग,
जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद
दिनांक :– 20.02.2025

प्रत, बेलिफ, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांना देण्यात येउन कळविण्यात येते की, सदरच्या नोटिस हया डकवून त्याबाबतचा अहवाल वेळेमध्ये सादर करण्यात यावा.

( एस. एस. गोरवाडे )
जिल्हा न्यायाधीश –09 तथा
अतिरिक्त सत्र न्यायाधीश, औरंगाबाद
District Judge
Additional Sessions Judge
Aurangabad

प्रत नोटिस बोर्डवर प्रसिध्दीसाठी लावण्याकरिता.

01) जिल्हा व सत्र न्यायालय औरंगाबाद यांच्या दोन्ही इमारतीतील नोटिस बोर्डवर
02) जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद.
03) तहसील कार्यालय, औरंगाबाद.
04) संगणक विभाग, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांना सदरची निविदा जिल्हा व सत्र न्यायालय औरंगाबाद यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्दीकरिता.

–000–